नि.दि.दा.क्र.१५५/२०२१

## निशाणी क्र. १७ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहित आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती होण्यासाठी दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ निशाणी क्र. १८ कडे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल न केल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींविरुध्द विना म्हणणे चालविण्यात आला.

०२. वादीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींचे वकील युक्तीवादाकामी गैरहजर रहिले. सबब, प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांच्या युक्तीवादाविना चालविण्यात आला.

०३. वादीने सदरचा दावा जाहीर होवून व निरंतरची ताकीद होण्यासाठी दाखल केला आहे. या अर्जाद्वारे वादीने सरनाम्यातील प्रतिवादी नं. ७ यशवंत सोपान ताठे (मयत) यांच्या समोर अ, ब, क, ड अशी लिहिलेली नावे वगळण्यास व तसेच प्रतिवादींच्या नंबर मध्ये दुरुस्ती होवून मिळण्याची मागणी केली आहे. वस्तुतः वादीने दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी नं. ७ यशवंत सोपान साठे यांचे अ, ब, क व ड कडे नमुद केलेले वारस अलहिदा प्रतिवादी नं. १, २, ३ व ४ म्हणून नोंदविले आहेत. त्यामुळे वादीने मागितलेली दुरुस्ती करण्यास कोणतीही अडचण नाही किंवा त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच प्रतिवादींचे नंबर बदलल्याने दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही किंवा सदर दरुस्ती केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. उलट दाव्याचा निकाल गुणगुणांवर होणेस मदत होणार आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. वादीने दाव्याच्या सरनाम्यात अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करावी.

०३. वादीने प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांच्या आत अर्जामध्ये नमूद दुरुस्ती करून दुरुस्ती दाव्याची प्रत सादर करावी.

०४. खर्चाबाबत आदेश नाही.

( एम. आर. कामत )

दिनांकः–१६/०४/२०२२. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | 3rd Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur |
| Name of Stenographer | : | S.M.Shaikh |
| Date | : | 16.04.2022. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 16.04.2022. |
| Judgment/Order uploaded on | : | 19.04.2022. |